# आदर्श उपविधी
# ( पोटनियम )

# विभागीय  सहकारी मंडळ

# पोटनियम

==============================================================

**पोटनियम क्रमांक** **पोटनियम**

==============================================================

1. **नांव** - या मंडळाचे नाव ------------- विभागीय सहकारी मंडळ मर्यादित ---------------- असे राहील. व यापुढे त्याचा विभागीय सहकारी मंडळ म्हणून उल्लेख केला जाईल.

2. **पत्ता** - या मंडळाचा रजिस्टर झालेला पत्ता ------------------------------------------------------------ ---------------------------------------------- हा राहिल. या पत्यात बदल झाल्यास त्याबाबत मा.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था व महाराष्ट्र राज्य सहकारी सघ यांना असा बदल झाल्यापासून 15 दिवसाचे आत कळविले जाईल.

2- **अ** <u>**व्याख्या** –</u>

१) **विभागीय सहकारी मंडळ** - विभागीय सहकारी मंडळ म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ९ अन्वये नोंदणीकृत झालेली विभागस्तरावरील असलेली --------------- विभागीय / प्रादेशिक सहकारी मंडळ मर्यादित,------------ ही संस्था

२) **संघ** - संघ म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे

**३)** **बोर्ड** - बोर्ड म्हणजे जिल्हा सहकारी बोर्ड

४) **संस्था** - संस्था म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ व १० अन्वये नोंदलेली अगर नोंद केली म्हणून समजण्यात आलेली सहकारी संस्था.

५) **अधिनियम** - अधिनियम म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

६) **नियम** - नियम म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१

७) **उपविधी** - उपविधी म्हणजे विभागीय/ प्रादेशीक सहकारी मंडळ मर्यादित चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १३ व १४ अन्वये नोंदणीकृत उपविधी

८) **शासन** म्हणजे महाराष्ट्र शासन

९) **संचालक समिती** - संचालक समिती म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अन्वये मंडळाच्या कारभाराची व्यवस्था पाहणेसाठी उपविधी क्र २२ प्रमाणे गठीत झालली संचालक समिती

१०) **निबंधक** - निबंधक म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३ अन्वये नेमलेली व्यक्ती

११) **पदाधिकारी** - पदाधिकारी म्हणजे उपविधी क्र.२२ अनुसार निवडून आलेले विभागीय मंडळाचे अध्यक्ष .

१२) **विभागीय सहकार विकास अधिकारी** - विभागीय सहकार विकास अधिकारी, म्हणजे प्रशासकीय कामकाज पार पाडणेसाठी जबाबदार असलेला अधिकारी व ते संचालक समितीचे कार्यलक्षी संचालक असतील मात्र संचालक समिती सभेत त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

१३) **सभासद**- सभासद म्हणजे संस्थेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी संस्था अथवा नोंदणीनंतर ज्याने सभासदत्व स्विकारले आहे अशी संस्था

१४) **सहकार वर्ष** - म्हणजे १ एप्रिल ते ३१ मार्च रोजी संपणारे वर्ष

१५) **सेवक** - म्हणजे विभागीय मंडळाचे काम पारपाडण्यासाठी नेमलेली पगारी व्यक्ती

१६) **क्रियाशिल सभासद** - क्रियाशिल सभासद म्हणजे जी संस्था सभासद / व्यक्ती सभासद विभागीय मंडळाच्या कारभारात भाग घेते किंवा यापुढील उपविधीमध्ये नमुद केले प्रमाणे सभासद विभागीय मंडळाच्या सेवांचा किंवा साधनांचा वापर करते अशी संस्था.

१७) **केंद्र** - सहकार प्रशिक्षण केंद्र

१८) **सोसायटी किंवा संस्था** - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सन 1960 अन्वये नोंदलेली व या मंडळाच्या पोटनियमानुसार सभासद होण्यास पात्र असणारी संस्था

**3. कार्यक्षेत्र -**

विभागीय मंडळाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रातील पुढील जिल्हयापुरते मर्यादित राहिल, ........................................................................ जिल्हे .व विभागतील नव्याने निर्माण होतील ते जिल्हे असे राहिल.

**4. उद्देश-**

1. सहकारी संस्थेतील सभासदांना शिक्षण प्रशिक्षण देणेची व्यवस्था करणे.
2. सहकारी परिषदा, परिसंवाद, मेळावे, शिबीरे, चर्चासत्रे वगैरे भरविण्याची व्यवस्था करणे व विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचे खास कार्यक्रम घेऊन त्यांचे प्रश्नासंबंधी पाठपुरावा करुन सोडविणे.
3. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचेवतीने सहकार शिक्षणाधिकारी व खालच्या दर्जाचे सेवकांवर नियंत्रण टेवणे.
4. मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सहकारी प्रशिक्षण केंद्रांच्या व जिल्हा सहकारी बोर्डाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याबाबतची व्यवस्था करणे.
5. सहकार, ग्रामीण आणि नागरी विकास व इतर तत्सम विषयाबाबत प्रचार करण्याची व्यवस्था करणे.
6. सहकारी संस्थेतील सभासद, संचालक, पदाधिकारी व सेवक वर्गाला सहकार शिक्षण, प्रशिक्षण देणेसाठी निधीची तरतूद करणे.
7. महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने शिक्षणनिधी गोळा करणे.
8. सहकार, ग्रामीण आणि नागरी विकास व तत्सम प्रश्नाच्या अभ्यासास उत्तेजन देणे व त्याबाबतचे संशोधन चालू ठेवणे.
9. सहकारी चळवळीशी संबंधित अशा विविध विषयावरील बिगर सरकारी मत प्रदर्शनासाठी प्रमुख केंद्र म्हणून काम करणे व त्या विचाराचे योग्यठिकाणी प्रतिनिधीत्व करणे व अशा विषयासंबंधी प्रचार करुन जनमत तयार करणे.
10. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने टरवून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार शिक्षण वर्गासाठी व सहकार प्रशिक्षण केंद्रासाठी वेळोवेळी शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडून आलेल्या सूचनांच्या आधाराने

त्यांच्या परिक्षा घेण्याची व्यवस्था करणे.

11. सहकारी संस्थांच्या सदस्यांना व सहकारी चळवळीत काम करणा-या कार्यकर्त्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि जनतेत सहकाराची तत्वे व आचार याची आवड निर्माण करणे.
12. सहकारी संस्थातील परस्पर संबंधांचा विकास करणे व सहकारी संस्थांमार्फत होणा-या विविध कार्यात समन्वय घडवून आणण्यास सहकार्य करणे.
13. मंडळाच्या उद्देशाचे पूर्तीसाठी स्थावर मालमत्ता मिळविणे, खरेदी करणे, मालकी हक्काने मिळविणे विक्री करणे, भाडयाने देणे अगर घेणे, अगर अन्य मार्गाने तिचे हस्तांतर करणे.
14. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने मंडळाकडे सोपविलेली इतर कामे करणे.

## 5. सभासद-

मंडळाचे सभासद पुढीलप्रमाणे असतील.

1. जिल्हा सहकारी बोर्डस
2. जिल्हा व जिल्हयापेक्षा अधिक कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा संयुक्त सहकारी संस्था
3. तालुका किंवा तालुक्यापेक्षा अधिक कार्यक्षेत्र परंतू जिल्हयापेक्षा कमी कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा ज्या प्रक्रिया औद्योगिक विपणन उत्पादक व ग्राहक सहकारी संस्थांचे भाग भांडवल व राखीव निधी मिळून रुपये 25,000/- पेक्षा अधिक आहे अशा सहकारी संस्था.
4. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
5. औद्योगिक सहकारी बँका
6. नागरी सहकारी बँका
7. सहकारी साखर कारखाने
8. व्यक्ति व आजीव सभासद

## 6. सभासदांना पुढीलप्रमाणे वार्षिक वर्गणी द्यावी लागेल.

| | | |
|---|---|---|
| 1. | जिल्हा सहकारी बोर्ड | रु. 1000-00 |
| 2. | जिल्हा किंवा जिल्हयापेक्षा अधिक कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा संयुक्त सहकारी संस्था | रु. 200-00 |
| 3. | तालुका किंवा तालुक्यापेक्षा अधिक कार्यक्षेत्र परंतु जिल्हयापेक्षा कमी कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा ज्या प्रक्रिया औद्योगिक, विपणन उत्पादक व ग्राहक सहकारी संस्थांचे भागभांडवल व राखीव निधी मिळून रु.25,000-पेक्षा अधिक आहे अशा सहकारी संस्था | रु. 100-00 |
| 4. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | रु.1000-00 |
| 5. | औद्योगिक सहकारी बँका | रु.1000-00 |
| 6. | नागरी सहकारी बँका | रु.1000-00 |
| 7. | सहकारी साखर कारखाने | रु.1000-00 |
| 8. | व्यक्ति | रु. 25-00 |

7. **अ)** सभासदांनी चालू वर्षाची वार्षिक सभासद वर्गणी सहकारी वर्षाच्या 31 मार्चअखेर दिली पाहिजे.

सभासदाची जबाबदारी त्याच्याकडून काही वर्गणी येणे राहिली असल्यास त्या वर्गणीच्या रक्कमेपेक्षा अधिक राहणार नाही.

**ब)** विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील पोटनियम क्र. ५ मधील नमूद संस्था / व्यक्ती मंडळाचे सभासद राहतील

मंडळाचे सभासदत्व मिळणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२ (१) प्रमाणे पात्रता असेल.

१) विभागीय मंडळाच्या सभासदत्वासाठी विभागीय मंडळाने निर्धारीत केलेला विहीत नमुन्यातील अर्ज केला पाहिज़े व त्यासोबत रु. १००/- प्रवेश फी दिली असली पाहिज़े

२) सभासदत्वासाठी दाखल केलेल्या अर्जावर अर्ज करणाऱ्या संस्थेच्या संचालक समितीचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे दोन सदस्य यांच्या सह्या असल्या पाहिजेत. व अर्जावर सह्या करण्याचा अधिकार दिलेला आहे, असा ठराव असला पाहिजे.

३) उपविधी क्र.६ अन्वये निर्धारीत केलेली सभासद वर्गणी सभासद अर्जासोबत दिली पाहिज़े तसेच सभासदत्व मिळाले नंतर सदर वर्गणी दरवर्षी सहकारी आर्थिक वर्ष संपलेनंतर सहा महिण्याचे आंत भरली पाहिजे.

4) व्यक्तिगत सभासदत्वासाठी करावयाचा लेखी अर्ज मंडळाने ठरविलेल्या अधिक्रृत नमुन्याप्रमाणे असला पाहिजे. अशी व्यक्ति किमान 5 वर्षे सहकारी संस्थेच्या पंचकमिटीवर काम केलेली असली पाहिजे.

8. व्यक्तीगत सभासद कोणत्याही वेळी राजीनामा देऊ शकतात मात्र त्यापूर्वी त्यांनी मंडळाला आपली सर्व सभासद वर्गणी व इतर काही देणे असल्यास दिली पाहिजेत. येणे वर्गणी व इतर येणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अन्वये वसूल करण्यात येईल.

**9. क्रियाशील सभासदाबाबत तरतूद-**

1. मागील सलग पाच वर्षात किमान एक अधिमंडळ वार्षिक बैठकीस उपस्थित रहाणे.

2. मागील सलग पाच वर्षात किमान एकदा विभागीय सहकारी मंडळाकडून सभासद संस्थेच्या समिती सदस्य किंवा कर्मचारी किंवा सभासदांना प्रशिक्षण घेणे किंवा विभागीय मंडळाकडून आयोजित केलेल्या परिसंवाद / चर्चासत्रात सहभागी होणे.

संस्थेने सभासदांचे अक्रियाशील असे वर्गीकरण केले त्यास आर्थिक वर्ष संपलेचे दिनांकापासून कळविले पाहिजे. तथापी . क्रियाशील व अक्रियाशील सभासदांचे वर्गीकरणाबाबत वाद उदभवल्यास असे वर्गीकरण केल्याचे दिनांकापासून 60 दिवसांचे आत निबंधकाकडे अपील करता येईल.

10. एखाद्या सभासदाने चालू सहकारी वर्षाच्या 31 मार्चअखेर चालू वर्षाची सभासद वर्गणी भरली नाही तर सभासद वर्गणी एक महिन्यात भरावी अशी नोटीस पाटविली जाईल. अशा थकबाकीदार सभासदास सदस्यत्वाचे अधिकार बजावता येणार नाही.

10. **अ)** ज्या सभासदांची चालू सहकारी वर्षाची वर्गणी 31 मार्च अखेर आली नसेल त्यांना मतदानाचा हक्क वापरता येणार नाही तसेच कार्यकारी समितीवर किवा मंडळाच्या इतर कोणत्याही उपसमितीवर निवडणूकीस तो अपात्र असेल.

ब) ज्या जिल्हा सहकारी बोर्डाने 30 एप्रिल पर्यंत त्यांचेकडे जमा होणा-या सभासद वर्गणीचा ¼ हिस्सा किंवा रु.1000/- यापैकी जी रक्कम जास्त असेल इतकी रक्कम या मंडळास दिनांक 31मे पुर्वी न भरल्यास ते जिल्हा

सहकारी बोर्ड थकबाकीदार म्हणून समजले जाईल.

11. मंडळाच्या सर्वसाधारण सभेत हजर असून मतदान करणा-या ¾ सभासदांच्या बहुमताने संमत केलेल्या ठरावानुसार कोणत्याही सभासदास खालील कारणासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम उपविधीतील तरतूदीनुसार काढून टाकता येईल

अ) विभागीय सहकारी मंडळाच्या हुकुमाचे किंवा टरावाचे जो सभासद बुध्दीपुरस्सर उल्लंघन करत असेल तर

ब) विभागीय सहकारी मंडळाच्या प्रतिष्ठेला बाधा आणण्याजोगे एखादे कृत्य त्याने बुध्दीपुरस्सर केले असेल तर

**11 अ) सभासदत्व पुढील कारणामुळे रद्द होते.**

1. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २५ मधील तरतुदी अन्वये.
2. पोटनियम क्रमांक 8 किंवा 8अ प्रमाणे राजीनामा दिल्यामुळे
3. दिवाळखोर झाल्यामुळे किंवा कायद्याने अपात्र ठरल्याने
4. नैतिक अध:पतन होणा-या गुन्हयाखाली एक महिन्यापेक्षा जादा काळासाठी शिक्षा झाल्यामुळे.
5. शारिरीक ,मानसिक किंवा कायदेशीरदृष्टया अपात्र झाल्यामुळे
6. मृत्यू झाल्यामुळे व संस्था गुंडाळण्यात आल्यामुळे.
7. थकबाकीदार असेल तर

**12. विभागीय सहकारी मंडळाच्या पैशावर नियंत्रण संचालक मंडळाकडे राहील. हा पैसा पुढील मार्गाने उभारण्यात येईल.**

1. सभासदाकडून आलेली वर्गणी
2. जिल्हा सहकारी बोर्डाकडून यावयाची पोटनियम क्रमांक 10 ब अन्वये ची वर्गणी रक्कम
3. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडून मिळणारे अनुदान
4. सहकार प्रशिक्षण केंद्रे , सहकारी जगत मासिक, मासिका विषयची प्रसिध्दी इतर प्रकाशने यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडून आलेली आर्थिक मदत.
5. हितचिंतकाकडून मिळालेल्या देणग्या
6. वाड.मय विक्री, मासिक विक्री यामार्गाने मिळालेले उत्पन्न
7. सहकारी कार्यकर्ता परिषद, परिसंवाद या उपक्रमासाटी घेतलेली वर्गणी
8. मंडळाच्या उद्देशाच्या पूर्तीसाठी सहाय्यक ठरतील असे निधी उभारता येईल.

13. **अधिमंडळाची वार्षिक बैठक** -

विभागीय मंडळाची **अधिमंडळाची वार्षिक बैठक** दरवर्षी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ मध्ये विहीत केल्याप्रमाणे ३० सप्टेंबर पर्यंत घेण्यात येईल.

२) विभागीय मंडळाचे सभासद असलेल्या सहकारी संस्थांना त्यांचे संचालक मंडळाने ठरावाद्वारे नियुक्त केलेल्या प्रतिनिधीना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचा अधिकार असेल व त्यामध्ये क्रियाशिल सभासदानांच प्रत्येकी एक मत असेल.

३) एकापेक्षा अधिक संस्थांचे प्रतिनिधीत्व करणा-या व्यक्तीस तो जितक्या संस्थांचे प्रतिनिधीत्व करीत असेल तेवढीच मते देता येतील.

४) साधारण सभेची सुचना सभासदांना पूर्ण १४ दिवसांची देण्यात येईल, या सुचनेत तारीख, वेळ, स्पष्ट पत्ता व सभेमध्ये चर्चेला येणारे विषय नमूद केलेले असतील, सभेची सुचना बोर्डाच्या अध्यक्षांच्या लेखी सुचनेनुसार बोर्डाचे विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांचे सहीने काढण्यात येईल. उपविधी नियम क्र. १७ (१) अन्वये मुदतीत वार्षीक सर्वसाधारण सभा घेण्याची जबाबदारी मा. अध्यक्ष व विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांची राहील.

५) **अधिमंडळाची वार्षिक बैठक** सभासद संख्येच्या १/५ किंवा १०० यापैकी जी संख्या कमी असेल तेवढी गणपूर्ती राहील. सभेची गणपूर्ती न झाल्यास सभेच्या सुचना पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल किंवा ७ दिवसांपेक्षा कमी नाही अशा नंतरच्या कालावधीपर्यंत तहकुब केली जाईल आणि अशा तहकुब सभेमध्ये मूळ संस्थेच्या विषय पत्रिकेवरील विषयाप्रमाणे कामकाज होईल अशा सभेस गणपूर्तीची आवयकता राहणार नाही.

६) **अधिमंडळाची वार्षिक बैठक**, संचालक मंडळ सभा, या सभांचे सभा वृत्तांत सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांसह त्याच कारणासाठी ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये सभेच्या अध्यक्षांच्या सहीने नोंदण्यात येतील. वार्षिक साधारण सभेचा इतिवृतांत संचालक समिती सभेपुढे कार्यवाहीसाठी ठेवण्यात येईल आणि तो पुढील वार्षिक साधारणसभेत कायम करण्यात येईल.

७) वार्षिक साधारण सभा, संचालक मंडळ सभा, या सभेपुढील सर्व विषयांवर उपस्थित व मतदान करणेस पात्र असणा-या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येतील. तथापी, समान मते पडल्यास सभेच्या अध्यक्षांना एक निर्णायक मत असेल मात्र पदाधिकारी निवडणुकीचे संदर्भात समान मत प्रसंगी चिठ्ठया टाकुन निर्णय घेण्यात येईल.

८) विभागीय मंडळाच्या **अधिमंडळाची** प्रत्येक **वार्षिक बैठकीच्या** कामकाजात खालील विषयांचा समावेश असेल.

- १) संचालक समितीकडून सादर झालेल्या वार्षिक कामकाजाचा अहवाल
- २) लेखापरीक्षीत ताळेबंद, उत्पन्न खर्च पत्रक व मागील लगतच्या आर्थिक वर्षीचा लेखापरिक्षण अहवाल सादर करणे
- ३) पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
- ४) आवश्यकतेनुसार विभागीय मंडळाची उपविधी आणि सर्व साधारण सभेने मंजूरी दिलेले विभागीय मंडळाचे नियम यातील सुधारणांवर विचार करणे व निर्णय घेणे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणे.
- ५) शिल्लक रकमेच्या विनीयोगासाठीची योजना
- ६) मागील लगतचे आर्थिक वर्षापूर्वीच्या वर्षाचा लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल
- ७) चालू आर्थिक वर्षासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील लेखा परिक्षकांची वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्ती करणे व त्याचे मानधन / लेखापरिक्षण शुल्क ठरवणे.
- ८) पुढील सर्वसाधारण सभेची तारीख ठरविणे
- ९) सभासदांचे हकालपटटी बाबत सभेपुढे आलेल्या विषयावर निर्णय घेणे

१०) विभागीय मंडळाच्या संचालक समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक व निवडणूक प्रक्रीया सुरू करण्याचा दिनांक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण व निबंधकास कळविणे व निवडणूक खर्चाची तरतूद करणे

११) अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या तरतुदीनुसार, नियमानुसार निबंधकाने मागवलेली इतर कोणतीही माहिती

१२) तक्रार निवारण समितीची निवड करणे.

१३) शासन अथवा इतर कोणत्याही संस्थोशी भागीदारी करार करणेबाबत निर्णय घेणे

१४) मत्ता व दायित्व एकत्रीकरण, विभाजन, हस्तांतरण याबाबत निबंधक / शासन यांचे पुर्वसंमतीने निर्णय घेणे

१५) रितसर विषय ठेवून सभेचे सुचनापत्र निर्गमित केले आहे असे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व विभागीय मंडळाने मंजुर उपविधीतील तरतुदीचे अनुषंगाने पार पाडावयाचे इतर कामकाज.

९) अधिमंडळ वार्षिक बैठक 30 सप्टेंबरपूर्वी घेणेची आहे.

१०) **अधिमंडळाची वार्षिक बैठकी**चे सुचना पत्र सदस्यांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टाने पाठविली जाईल व बैठकीचे सूचना पत्र व वार्षिक अहवाल संस्थेच्या नोटीस फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. केवळ कोणत्याही सदस्यास सुचनापत्र व वार्षिक अहवाल मिळाला नाही याच कारणासाठी साधारण सभा बेकायदेशीर ठरू शकणार नाही.

११) **अधिमंडळाची वार्षिक बैठकी**च्या अथवा त्या कारणासाठी खास बोलाविलेल्या साधारण सभेस उपस्थित असलेल्या आणि मतदान करणा-या सदस्यांच्या २/३ बहुमताने ठरल्याशिवाय मंजूर उपविधीतील कोणताही उपविधी बदलता येणार नाही, रद्द करता येणार नाही अथवा त्यात भर घालता येणार नाही. तसेच निबंधकाने मान्य केल्याशिवाय आणि नोंदविल्याशिवाय उपविधीतील सुधारणा अंमलात येणार नाही.

विभागीय मंडळाच्या वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना / प्रतिनिधींना/ संचालक मंडळ सदस्यांना / पदाधिका-यांना विभागीय मंडळाकडून प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

१२) **तक्रार निवारण समितीबाबत तरतूद /**

संचालक नसलेल्या तीन क्रियाशील सभासदांची तक्रार निवारण समितीची नियुक्ती अधिमंडळ वार्षिक बैठकीत करण्यात येईल. सदर समिती अधिनियमातील कलम 89 (AB) प्रमाणे काम करेल.

**14.** सदस्य संस्थांच्या अधिकृत प्रतिनिधींना अधिमंडळाची वार्षिक बैठकीला हजर रहाण्याचा व प्रत्येकी एक मत देण्याचा अधिकार राहील.

व्यक्तिगत सभासदासाठी मतदानाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील अधिनियम 2 (13) प्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 मधील नियम क्रमांक 22 प्रमाणे मतदानाची पध्दत अवलंबली जाईल. व्यक्तीगत सभासदातर्फे अधिमंडळ वार्षिक बैठकीसाठी मत देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाखाली मंडळाने तयार केलेल्या निवडणूक नियमाप्रमाणे प्रतिनिधी निवडणेत येतील.

15. अधिमंडळ वार्षिक बैठकीची सूचना पत्र 14 दिवस अगोदर मंडळाचे सामील सहकारी संस्था, व्यक्तिगत सभासद व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांना दिली जाईल. या सूचना पत्रात सभेचे ठिकाण, तारीख, वेळ आणि बैठकीपुढे येणारी कामे नमूद असतील. ही बैठक संचालक मंडळाने ठरविल्याप्रमाणे प्रादेशिक सहकारी मंडळाचे कार्यालयात किंवा मंडळाचे कार्यक्षेत्रातील इतर कोणत्याही सोईच्या ठिकाणी भरविली जाईल.

अ) विभागीय मंडळाच्या पहिल्या साधारण सभेचे अधिकार व कामे अधिमंडळ वार्षिक बैठकीस असतील.

16. अधिमंडळ वार्षिक बैठकीसाठी व्यक्तिगत सभासदांनी मतदानासाठी निवडलेले प्रतिनिधी व संस्था प्रतिनिधी मिळून 25 अगर संस्था प्रतिनिधी, व्यक्ति प्रतिनिधी मिळून होणा-या संख्येच्या 15 यापैकी कमी नसणा-या संख्येइतकी गणसंख्या राहील. मात्र अशा सभेमध्ये कोणत्याही वेळी व्यक्ती सभासदाचे प्रतिनिधी हजर असणारे एकूण संस्था सभासदांच्या प्रतिनिधीच्या ¼ पेक्षा अधिक असणार नाहीत. याप्रमाणे बैठकीस गणसंख्या न झालेली बैठक तहकूब केली जाईल. या बैठकीसाठी पाठविलेल्या नोटीशीमध्ये नमूद केलेली असल्यास अशी तहकूब बैठक अर्धा तासाने भरविणेत येईल व अशा तहकूब बैठकीसाठी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही व मुळ बैठकीच्या नोटीशीवर नमूद केलेली कार्यक्रमपत्रिका हीच तहकूब बैठकीची कार्यक्रम पत्रिका राहील. मंडळाचे सभासदाने 5 वर्षात किमान एका अधिमंडळ वार्षिक बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

17. अधिमंडळ वार्षिक बैठक आणि संचालक मंडळाची बैठक यांचे कामकाजाचा वृत्तांत त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र पुस्तकामध्ये लिहून ठेवण्यात येईल. त्यावर मंडळाचे अध्यक्ष व मानद सचिवांची स्वाक्षरी असेल.

18. अधिमंडळ वार्षिक बैठक आणि संचालक मंडळाची बैठकीच्या वेळेचे सर्व ठराव उपस्थित असलेल्या व मतदानास पात्र असणा-या सभासदांच्या बहुमताने मंजूर केले जातील. पदाधिका-यांच्या निवडणुकीशिवाय इतर ठरावांवर समान मतप्रसंगी बैठकीच्या अध्यक्षांना एक जादा किंवा निर्णायक मत देता येईल.

19. अधिमंडळ वार्षिक बैठकीस उपस्थित राहण्यासाठी प्रादेशिक मंडळ आपल्या सभासदांना कोणताही प्रवासखर्च देणार नाही.

20. **अधिमंडळाची विशेष बैठक -**

1. संचालक मंडळाने दिलेल्या सुचनेनुसार एक महिन्याचे आत पुढील कारणासाठी अध्यक्षांच्या संमतीने मानद सचिव विशेष साधारण बैठक बोलावतील.

अ) कार्यकारी समितीने बहुमताने घेतलेल्या निर्णयानुसार

ब) मा. निबंधक सहकारी संस्था यांचे आदेशावरुन

क) एकूण सभासदापैकी 15 अगर 25 सभासद यापैकी कमी असलेल्या संख्येइतक्या सभासदांनी केलेल्या मागणीवरुन या बैठकीची पूर्ण 14 दिवसाची आगावू सुचना दिली जाईल

21. अधिमंडळ वार्षिक बैठक, अधिमंडळाची विशेष बैठक व संचालक मंडळ बैठकीच्यावेळी मंडळाचे अध्यक्ष हे बैठकीचे अध्यक्ष राहतील. त्यांचे गैरहजेरीत बैठक दुस-या अध्यक्षांची निवड करील.

22. **संचालक मंडळ** -

प्रादेशिक सहकारी मंडळाची संचालक मंडळ रचना पुढीलप्रमाणे /

| | |
|---|---|
| 1. मंडळाचे कार्यक्षेत्रातील जिल्हा सहकारी मंडळाचे प्रतिनिधी-- | 9 |
| 2. जिल्हा किंवा जिल्हयापेक्षा अधिक कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा संयुक्त सहकारी संस्थेचा प्रतिनिधी | 1 |
| 3. तालुका किंवा तालक्यापेक्षा अधिक कार्यक्षेत्र परंतू जिल्हयापेक्षा कमी कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्था किंवा ज्या प्रक्रिया, औद्योगिक , विपणन, उत्पादक व ग्राहक सहकारी संस्थांचे भागभांडवल व राखीव निधी मिळून रु.25,000- पेक्षा अधिक आहे अशा सहकारी संस्थांचा प्रतिनिधी | 1 |
| 4. सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा प्रतिनिधी | 1 |
| 5. सर्व नागरी व इतर सहकारी बँकांचा (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका वगळून) प्रतिनिधी | 1 |
| 6. सर्व साखर कारखान्यांचा प्रतिनिधी | 1 |
| 7. व्यक्तिगत प्रतिनिधी | 1 |
| 8. आजीव सभासद प्रतिनिधी | 1 |
| 9. महिला प्रतिनिधी | 2 |
| 10.अनुसुचित जाती जमाती प्रतिनिधी | 1 |
| 11. इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | 1 |
| 12. विमुक्त व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| | ------------ |
| | 21 |
| 13. तज्ञ संचालक | 2 |
| 14. कार्यलक्षी संचालक (फंक्शनल डायरेक्टर) | 2 |

वरील पध्दतीने स्थापन झालेले संचालक मंडळ आपले अध्यक्ष व मानद सचिव यांची निवड करील, नविन अध्यक्ष व मानद सचिव निवडून येईपर्यंत जुने अध्यक्ष व मानद सचिव काम पहातील.

1- संचालक मंडळाची निवडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणमार्फत होईल

2- संचालक मंडळाचा कालावधी निवडणूकीच्या दिनांकापासून 5 वर्षाचा राहील

3- पदाधिका-यांचा कालावधी 5 वर्षांचा राहील

4- दोन तज्ञ व दोन कार्यलक्षी संचालकांना पदाधिका-याच्या निवडणूकीत मतदानाचे अधिकार असणार नाही व ते पदाधिकारी म्हणून निवडणूकीसाटी पात्र असणार नाही

5- कार्यलक्षी संचालक हा संस्थेच्या नोकरीत असलेला व व्यवस्थापनातील असावा

6- संचालक मंडळावरील रिक्त पदे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 अन्वये भरता येतील.

7- संस्थेची निवडणूक अस्तित्वातील समितीचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी घेण्यात आली पाहिजे

8- कार्यकारी मंडळाचा कोणताही सभासद मंडळाच्या लागोपाट 3 सभांना विनापरवानगी गैरहजर राहिल्यास कार्यकारी मंडळावरील त्याचे सभासदत्व रद्द होईल .

22-**अ**- कोणत्याही सहकारी संस्थेकडे थकबाकीदार असणा-या सभासदाचे नांव निवडणूकीसाठी सुचविता येणार नाही किंवा त्यास व्यवस्थापक समितीवर निवडून येता येणार नाही. तसेच नांव सुचविल्यानंतर किंवा निवडणूकीनंतर त्याचेकडे थकबाकी असल्यास व्यवस्थापक समितीचा सदस्य म्हणून राहता येणार नाही, त्यांचेकडे बाकी थकली आहे ही माहिती व्यवस्थापक समितीचे निदर्शनास आलेल्या तारखेपासून त्याचे सदस्यत्व रद्द होईल.

23. **व्यवस्थापक** समितीचा प्रत्येक सभासद निवडणूकीपासून पाच वर्षापर्यंत अधिकार पदावर राहील. मात्र जिल्हा सहकारी बोर्डाचे प्रतिनिधी त्यांच्या बोर्डाच्या संचालक मंडळावर संचालक नसेल तर त्याचे या मंडळाचे संचालक मंडळावरील सदस्यत्व आपोआप
संपुष्टात येईल.

24. **संचालक मंडळाची कामे पुढीलप्रमाणे राहतील.**

1. प्रादेशिक मंडळाचा वार्षिक अहवाल आणि हिशेबाची पत्रके तयार करणे व पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करणे.

1. अंदाजपत्रकातील मंजूर झालेल्या रक्कमेच्या मर्यादेत निरनिराळया कारणासाठी आवश्यक त्या खर्चास मंजूरी देणे.
2. जिल्हा सहकारी बोर्डाचे अंदाजपत्रक तपासणे व त्यांची छाननी करणे व महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडे ती मंजूरीसाठी पाटविणे.
3. पोटनियम क्र.12 (अ), (ब), (क) प्रमाणे वर्गणी व शिक्षणनिधी संकलन करणे.
4. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ अगर इतर कोणत्याही जबाबदार अधिका-याने सहकारी संस्थांकडे विचारणा केलेल्या प्रश्नाबाबत आवश्यकता असेल तर अशा संस्थांची मते मागविणे आणि महाराष्ट्र राज्य सहकारी संघामार्फत आपला विचार कळविणे.
5. निरनिराळया प्रश्नांचा विचार करण्यासाटी आणि निरनिराळी कामे करण्यासाटी मंडळांच्या संचालक मंडळाच्या सभासदांमधून समित्या नेमणे.
6. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या परवानगीने विभागीय सहकारी परिषद किंवा इतर परिषदा, परिसंवाद, शिबीरे आणि मेळावे भरविणे.
7. मंडळाकडील सचिव व इतर सेवक वर्गावर नियंत्रण टेवणे
8. सहकारी नियतकालिके, पुस्तिका, सहकारविषयक इतर वाङ.मय प्रसिध्द करणे
9. सहकारविषयक प्रश्नाचे अभ्यासास उत्तेजन देणे व त्याबाबत संशोधन करणे
10. सहकार प्रशिक्षण केंद्राचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे व जिल्हा सहकारी बोर्डांना मार्गदर्शन करणे
11. सहकारी संस्थेतील सभासदांना शिक्षण प्रशिक्षण देणे.
12. नविन सभासद करुन घेणे , थकबाकीदार व अक्रियाशील सभासदांसंबंधी अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करणे
13. प्रसिध्दीची व्यवस्था करणे व त्याचबरोबर सहकार प्रबोधनासाठी नियतकालिकांची प्रसिध्दी करणे.
14. सहकार व इतर संबंधित विषयांचा प्रचार करण्याची व्यवस्था करणे

15. मंडळाचे सभासदाकडून आलेल्या पोटनियमविषयक दुरुस्त्याबाबत विचार करणे व अधिमंडळ वार्षिक बैठकीपुढे टेवणे.

16. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे सर्वसाधारण देखरेखीखाली प्रादेशिक मंडळाचे कार्य चालविणे.

17. आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यात विभागीय सहनिबंधकाकडे संचालक मंडळ खालील विवरण पत्रे सादर करतील.

1. विभागीय सहकारी मंडळाच्या कार्याची माहिती.
2. लेखा परिक्षण अहवाल
3. वाषिर्क सभेची तारीख निवडणूक असल्यास त्याची तारीख
4. मा. विभागीय सहनिबंधकांनी कायदा, नियम व उपविधीस अनुसरुन विचारलेली इतर माहिती
5. लेखापरिक्षकाची नेमणूक व त्याची संमती.
6. निबंधकाने कायदयातील तरतुदीस अनुसरून विचारलेली इतर माहिती

25. **संचालक** मंडळाची बैटक दर तीन महिन्यात निदान एक वेळ तरी भरविली जाईल. संचालक मंडळाच्या बैठकांची कमीतकमी 10 दिवसांची नोटीस अध्यक्षांचे सुचनेनुसार मानदसचिवांनी पाठविली पाहिजे. या नोटीशीत बैठकीचे टिकाण, तारीख, वेळ व बैठकीपुढे येणारे विषय नमूद केले जातील.

बैठकीस गणसंख्या सात सभासदांची असेल. मंडळाच्या पदाधिका-यांना आवश्यक वाटेल त्यावेळी संचालक मंडळ सभासदाकडून परिपत्रकाद्वारे मते मागवून मंडळाचा व्यवहार करणेचा अधिकार राहील. परिपत्रकातील विषयाबाबत संचालक सभासदामध्ये मतभेद असतील तर त्या विषयांचा निकाल संचालक मंडळाची बैटक होईपर्यंत तहकूब टेवण्यात येईल. बैटकीपुढे आलेल्या सर्व विषयांचा निर्णय बहुमताने घेतला जाईल आणि ज्यावेळी दोन्ही बाजूस समान मते पडतील त्यावेळी अध्यक्षांना निर्णायक किंवा एक जादा मत असेल.

26. संचालक मंडळाच्या किंवा तिच्या कोणत्याही उपसमितीच्या घटनेमध्ये एखादा दोष किंवा उणिव आढळून आल्यामुळे त्या संचालक मंडळाची किंवा तिच्या उपसमितीची कोणतीही कृत्य किंवा सभावृत्तांत याबद्दल हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

**27.अ) मानद सचिव-**

मानद सचिव अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली काम करतील. त्यांची कामे पुढीलप्रमाणे राहतील.

1. अध्यक्षांच्या सुचनेनुसार मंडळाकडील सेवक वर्गाच्या कामांचे वाटप करणे.
2. रोख शिल्लक बँकेत भरण्यापर्यंत शिल्लक सुरक्षित ठेवणे
3. कायद्यातील नमुन्याप्रमाणे प्रादेशिक मंडळाचे सर्व रजिस्टर्स, हिशेबाची पुस्तके ठेवण्याची व्यवस्था करणे.
4. अध्यक्षांच्या सुचनेनुसार संचालक मंडळ व उपसमित्यांची बैठक बोलविणे व सभावृत्तांत लिहून ठेवण्याची व्यवस्था करणे.
5. मंडळाचेवतीने पत्रव्यवहार करणे.

ब) विभागीय सहकारी मंडळाचे सर्व दस्तऐवज आणि महत्वाचे कागदपत्रांवर अध्यक्ष आणि मानद सचिव दोघेही सहया करतील.

क) **सचिव-**

मंडळाचे सचिव हे प्रमुख अधिकारी म्हणून अध्यक्ष व मानद सचिव यांचे नियंत्रणाखाली काम करतील.

28. मंडळाचे व्यवहारासाठी उपयोगात न आणला जाणारा पैसा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे कलम 70 मधील नियमाप्रमाणे गुंतविला जाईल व ठेव म्हणून ठेवला जाईल.

29 .**इतर बाबी-**

अधिमंडळ वार्षिक बैठकीला असलेल्या कोणत्याही अधिकाराला बाधा न येता यापुढे पोटनियमाचे पूर्ततेसाठी आणि विभागीय मंडळाचे कामकाज योग्यपध्दतीने होण्यासाठी संचालक मंडळास नियम करणेचा अधिकार राहील. हे नियम पुढील अधिमंडळ वार्षिक बैठक अगर अधिमंडळ विशेष बैठकीपुढे मंजूरीसाठी ठेवले जातील आणि या बैठकीने ते दुरुस्त किंवा नामंजूर केले नसल्यास अमलात राहतील. ते पुढील बाबीसंबंधी असू शकतील.

1. विभागीय आणि इतर सहकारी परिषदा भरविण्याबाबत आणि त्यांचे कामकाजाबाबत
2. संचालक मंडळ आणि इतर उपसमित्यांच्या सभासदांना आणि प्रादेशिक मंडळाचे अधिका-यांना प्रवासभत्ता देणेबाबत मंजूरी देणे
3. सहकार प्रशिक्षण केंद्रे व जिल्हा सहकारी बोर्डाचे कामकाजावर नियंत्रण टेवणे

30. विभागीय सहकारी मंडळाला कोणतीही स्थावर इस्टेट, वहिवाटीचा हक्क, यंत्रसामुग्री, व्यवहारातील शिल्लक माल, वहिवाटीचे कोणतेही अधिकार व सवलती, स्टॉक , शेअर्स, रोखे व प्रादेशिक मंडळाला जे आवश्यक किंवा अपरिहार्य वाटत असतील अशा गोष्टी खरेदी करण्याचा कराराने , भाडयाने देणेचा किंवा घेणेचा , त्यावर हक्क प्रस्तापित करणेचा तसेच विकण्याचा, गहाण ठेवण्याचा , तारणावर पैसे घेणेचा व विकून टाकण्याचा किंवा कोणत्याहीप्रकारे याबाबत व्यवहार करणेचा अधिकार राहील.

31. विभागीय सहकारी मंडळासाठी संचालक मंडळ शिक्का ठरवून देईल आणि वेळोवेळी त्याचा नाश करुन त्याऐवजी दुसरा तयार करणेचा अधिकार असेल.

32. नोटीस द्यावयाची असेल अशा प्रत्येक वेळी सभासदांच्या नोंदविलेल्या पत्यावर नोटीस पोस्टात टाकली म्हणजे ती पाठविली असे मानले जाईल.

33. विभागीय सहकारी मंडळ कोणत्याही आंतरप्रांतीय किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेस संलग्न करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

34. या पोटनियमातील कोणताही पोटनियम अधिमंडळ वार्षिक बैठक किंवा त्यासाठी भरविलेल्या अधिमंडळाची विशेष बैठकीवेळी उपस्थित असलेल्या सभासदांच्या 2/3 बहुमताने मंजूर केल्याशिवाय दुरुस्त केला जाणार नाही. यासाठी बोलाविण्यात येणा-या बैठकीच्या नोटीशीत करावयाचे पोटनियम दुरुस्तीबाबत, नविन पोटनियम करणेबाबत किंवा सध्याचा पोटनियम काढून टाकण्याबाबत उल्लेख केला जाईल आणि बैठकीच्या दिवसापूर्वी कमीतकमी 14 दिवस ती पाठविली जाईल. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांनी दुरुस्ती मंजूर करुन ती नोंदविल्याखेरीज तिची अंमलबजावणी सुरु होणार नाही.

35. विभागीय सहकारी मंडळ / महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.,पुणे या संस्थेला संलग्न राहील.

टिप : उपरोक्त नमूद उपविधीतील कोणतीही तरतुद भारतीय संविधान ,सहकारी संस्थांचा कायदा व नियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यास ती लागू होणार नाही.

----------------------------------------